# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## खुलासा आदेश क्र.१९२७/२०२५ (अपिल क्रमांक : के.आर- १०४०/२०२१)

अपिलार्थी, श्री.स्वप्निल ललित ठाकूर,
ऑफीस नं.८, साईराज बिल्डींग नं.२, श्री मलंग रोड, नांदिवली,
सेंट्रल बॅंकेजवळ, कल्याण (पूर्व), ता.कल्याण, जि.ठाणे.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक,
उप अधीक्षक भूमी अभिलेख, कल्याण यांचे कार्यालय,
झुंझारराव मार्केट, झुंझारराव इमारत, ३ रा मजला,
धान्य बाजार, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २२.०७.२०२१**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०९.२०२० | --- | ३१.१२.२०२० | --- |

अपीलार्थीस दि.२५.०९.२०२० च्या माहिती अर्जान्वये मागितलेली प्लॉट नं.२६, एडमेंजरिंग ६८८, sq.yds.out सर्वे नं.२२९, हिस्सा नं.३/२/२ टिटवाळा, ता.कल्याण येथील या जागेची सर्वेक्षण नकाशाची साक्षांकित प्रत मिळावी.या विषयाची माहिती न मिळाल्यामुळे आयोगास दि.२५.०३.२०२१ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपिलावर आज दिनांक २२.०७.२०२१ रोजी **गुगल मिट (Google meet ) ॲप द्वारे ऑनलाईन** सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर भोसले तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक, भुमि अभिलेख, कल्याण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांच्या दिनांक २५.०९.२०२० च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. यास्तव दिनांक ३१.१२.२०२० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिल प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही व आदेश पारित केले नाहीत. यास्तव द्वितीय अपिल दाखल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आदेश पारित केले नसल्यामुळे त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले की, अपिलार्थींनी माहिती अर्जान्वये "प्लॉट नं.२६, एडमेंजरिंग ६८८, sq.yds.out सर्वे नं.२२९, हिस्सा नं.३/२/२ टिटवाळा, ता.कल्याण येथील या जागेची सर्वेक्षण नकाशाची साक्षांकित प्रत मिळावी." अशा प्रकारची माहिती मागीतली होती.

त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती दिली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१३.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती दिलेली आहे. परंतु अपिलार्थींचा माहिती अर्ज दि.२५.०९.२०२० रोजीचा आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उशिराने माहिती दिली आहे. तसेच सदर पत्र अपिलार्थींना दिल्याबाबतची पोहोच सादर केली नाही. त्यामुळे माहिती दिली असे म्हणतात येणार नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश निर्गमित करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर भोसले तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भुमि अभिलेख, कल्याण यांनी **अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर भोसले तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भुमि अभिलेख, कल्याण यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २५.०९.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.संग्राम जोगदंड तथा उप अधीक्षक, भुमि अभिलेख कल्याण यांनी अपीलार्थी यांनी दिनांक ३१.१२.२०२० अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

४. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक के.आर.१०४०/२०२१निकाली काढण्यात येत आहे.

**सही/-**
**(के.एल.बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ जुलै, २०२१ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.संग्राम जोगदंड तथा उप अधीक्षक भूमी अभिलेख,
कल्याण, झुंझारराव मार्केट, झुंझारराव इमारत, ३ रा मजला,
धान्य बाजार, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे.

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर भोसले तथा मुख्यालय सहाय्यक,
उप अधीक्षक भुमि अभिलेख, कल्याण, यांचे कार्यालय,
झुंझारराव मार्केट, झुंझारराव इमारत, ३ रा मजला,
धान्य बाजार, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे.

## विवेचन

उपरोक्त आदेशान्वये तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण ३० दिवसांत आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते. **तसेच** तत्कालिन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेविरूध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.माअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा १५ दिवसात आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.निलेश खाडे, प्र.मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय कल्याण उपस्थित आहेत. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर भोसले व तत्कालिन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.संग्राम जोगदंड हे अनुपस्थित आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.निलेश खाडे यांनी आज दि.२०/५/२०२५ रोजी आयोगास समक्ष खुलासा सादर केला की, तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर भोसले हे सेवानिवृत्त झालेले असून, त्यांना सदर सुनावणीस उपस्थित राहणेबाबत कार्यालयाच्या दि.७/५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद व नस्तीवरील कागदपत्रे विचारात घेता दिसून आले की, सदर प्रकरणात आयोगाने दि.२२/७/२०२१ रोजी सुनावणी घेऊन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय कल्याण यांनी अपीलकर्तास १५ दिवसात माहिती पुरवावी असे आदेशित केले होते. तथापि त्यांनी अद्याप अपीलकर्तास आयोगाच्या आदेशानुसार माहिती दिली नाही तसेच आयोगास अहवाल सादर केलेला नाही. आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी अद्याप झाल्याचे दिसून येत नाही.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर भोसले हे सेवानिवृत्त झालेले असून, सदर पदावर त्यांच्यानंतर कार्यरत असलेले श्री.प्रकाश परदेशी यांनी देखील आयोगाच्या आदेशानुसार अपीलार्थीस अद्याप माहिती पुरविलेली नाही, म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा मागविणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) आयोगाच्या दि.२२/७/२०२१ रोजीच्या आदेशात नमूदप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय कल्याण यांनी **अपीलकर्ता यांना तातडीने व कोणत्याही परिस्थितीत १५ दिवसांत माहिती नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२) तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश परदेशी, मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय कल्याण यांनी अपीलकर्ता यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या आदेशानुसार माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर समक्ष उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३) आयोगाच्या दि.२२/७/२०२१ रोजीच्या आदेशात नमूदप्रमाणे तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.संग्राम जोगदंड तथा उप अधीक्षक, भुमि अभिलेख कल्याण यांनी त्यांचा लेखी खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर समक्ष उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

४) प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५/६/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २० मे, २०२५.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश परदेशी, मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय कल्याण **तसेच** तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.संग्राम जोगदंड तथा उप अधीक्षक, भुमि अभिलेख कल्याण **- यांना प्रत-**

--- विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.निलेश खाडे,
प्र.मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय कल्याण,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका इमारत,
२ रा व ३ रा मजला, कोहिनुर लाइफ स्टाईल,
तारांगण सोसायटीजवळ, वायले नगर, कल्याण (प) ४२१३०१ **यांचेमार्फत प्रत रवाना.**